अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.७४/२०२३

जा.क्र उआ (सा.प्र.)/ आस्था/६७४५ दि. २० /०९/२०२३

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका**

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/७४/२०२३

प्रति,

श्री.ऋषिकेश हरिदास उपाधे

५, हरिकुंज भवन, नगरपरिषद कॉलनी

करंज, वाशिम-४४४१०५

यांस

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.ऋषिकेश हरिदास उपाधे, ५, हरिकुंज भवन, नगरपरिषद कॉलनी, करंज, वाशिम-४४४१०५ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी दि.११/८/२०२३ ऑनलाईन(PUMCO/R/2023/61199) आ.क्र.९८३७, दि.१०/०८/२०२३ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/६२५६, दि.०७/०९/२०२३ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| १०/८/२०२३ | ११/८/२०२३ | १०/९/२०२३ | ०७/०९/२०२३ | ० |

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती दिशाभूल, अर्धवट व अपूर्ण असल्याने अपिल सुनावणी घेणेकामी ऑनलाईन (PUMCO/A/2023/60199) दि.११/०९/२०२३ (आ.क्र.९८३७ दि.११/९/२०२३) रोजी अर्ज दाखल केलेला आहे. अपिलार्थी यांना दि.१२/९/२०२३ रोजी संपर्क साधला असता ऑनलाईन सुनावणी आयोजित करणेस ईमेलद्वारे कळविण्यात आले.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०९/०९/२०२३ | ११/०९/२०२३ | ०६/१०/२०२३ | होय | -- |

अपिल दिनांक १८/०९/२०२३ रोजी दुपारी ३.०० वा. सुनावणी ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. अपिलार्थी यांना दि.१७/९/२०२३ दूरध्वनीवरुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत संपर्क साधून उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आले आहे. ऑनलाईन सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी "Provided Incomplete, Misleading or False information' माहिती अधिकारांतर्गत अर्जातील ४ ही मुद्यांची माहिती मुद्देसूद परिपत्रकानुसार, शासन निर्णयाप्रमाणे देण्यात यावी तसेच माहिती अधिकार कायद्यातील कोणत्याही बेकायदेशीर कलम वापरुन माहिती देण्यास टाळटाळ करु नये तसेच पूर्णपणे जेवढी मागितलेली माहिती आहे तेवढी संपूर्णपर्ण माहिती देण्यात यावी," असे अपिल अर्जात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी माहिती अधिकारात अर्जास जा.क्र.जमाअ/आस्था/६२५६, दि.०७/९/२०२३ रोजीचे पत्रान्वये दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मागितलेली माहिती | उपलब्ध माहिती |
|---|---|---|
| १.१ | पुणे महानगरपालिका येथे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) चे किती पदे मंजूर आहेत? | उपलब्ध असलेल्या माहितीच्या प्रतीची संख्या २ आहे. त्रैमासिक अहवाल दि.१/४/२०२३ ते ३०/६/२०२३ |
| १.२ | सन २०२२ मध्ये झालेल्या पदभरतीमध्ये किती पदे भरण्यात आलेल्या आहेत? | सन २०२२ मध्ये १३५ पदे पदभरण्यात आली अतिमआ(ज)/साप्रवि/९९१० दि.३०/१२/२०२२ रोजीचे आज्ञापत्र. (उपलब्ध माहिच्या १० प्रती आहे) |
| १.३ | सन २०२२ मध्ये झालेल्या पदभरती मध्ये किती उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली? | मुद्दा क्र.२ प्रमाणे |
| १.४ | दि.३०/८/२०२३ रोजीचा कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील रिक्त पदाचा अहवाल देण्यात यावा. | मुद्दा क्र.२ प्रमाणे |
| २ | पुणे महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदाचे सेवा प्रवेश नियम अद्ययावत करुन अंतिम मंजूरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आले आहे, असे कळाले. असा जर पत्रव्यवहार झाला असेल तर तो मला पाठविण्यात यावा. | माहितीच्या प्रतीची संख्या ६ आहे. |
| ३ | आगामी काळात पदभरती साठी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) चे किती पदे भरणार आहेत व तसेच पदभरती केव्हा होणार आहे? | माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ चे पोट कलम (च) मध्ये व्याख्या केलेली माहिती पुरविणे अभिप्रेत आहे. प्रश्नार्थक |

| अ.क्र. | मागितलेली माहिती | उपलब्ध माहिती |
|---|---|---|
| | | स्वरुपाची माहिती पुरविणे अभिप्रेत नाही. |
| ४. | आगामी होणाऱ्या पुणे महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील पद भरतीमध्ये अनुभवाची अट कायम राहिल किंवा रद्द होईल हे स्पष्ट करण्यात यावे व तसेच अनुभावची अट शिथील किंवा रद्दसाठी शासनाला केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत देण्यात यावी. | अभिलेखाची पाहणी केली असता सदर माहिती उपलब्ध होईल असे अभिलेख उपलब्ध नाहीत. |

अपिलार्थी यांना दि.७/९/२०२३ रोजी १८ प्रतींसाठी र.रु.३६/- भरणेकामी कळविण्यात आले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले. पैसे भरण्यात न आल्याने प्रती देण्यात आले नसल्याचे नमूद केले. मुद्दा क्र.१.१ व १.४ ची माहिती रिक्त पदे दर्शवून पुन:श्च विनामूल्य द्यावीत. मुद्दा क्र.१.२ नुसार १३५ पदे भरलेची स्वयंस्पष्ट माहिती नमूद करणेत आली आहे. आज्ञापत्राच्या प्रती संकेतस्थळावर उपलब्ध असून याबाबत त्यांना लिंक देणेत यावी. जरुर तर मागणी केलेल्या आज्ञापत्राच्या प्रती विहित शुल्क आकारुन द्यावी. मुद्दा क्र.२ ची माहिती विहित शुल्क भरुन उपलब्ध करुन द्यावी. कारण विहित शुल्काबाबत त्यांना यापूर्वीच कळविले आहे. मुद्दा क्र.३ व ४ ची माहिती प्रश्नार्थीक व भविष्यात होणाऱ्या घटनांबाबत असल्याने ती माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नसल्याचे अपिल अधिकारी यांनी नमूद केले. सदर विवेचनाअंती पुढील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे, महानगरपालिका यांनी मुद्दा क्र.१.१ व १.४ ची रिक्त पदांची माहिती नमूद करुन विनामूल्य द्यावी. मुद्दा क्र.१.२ व १.३ बाबत संकेतस्थळाची लिंक द्यावी. अपिलार्थीस आज्ञापत्राची प्रत आवश्यक असल्यास शुल्क भरुन घेवून देण्यात यावी. मुद्दा क्र.२ ची माहिती अपिलार्थी यांना शुल्क भरुन घेवून उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.७४/२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

20/9/23
(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.